# स्थानिक स्वराज्य संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी

**प्रस्तावना :**

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी ग्रामराज्य स्थापनेचा आग्रह धरला होता खेड्यांना राजकीय स्वायत्तता बहाल करावी आणि खेडी ही स्वयंपूर्ण राजकीय व आर्थिकघटक बनवली जावीत असे त्यांचे प्रतिपादन होते. महात्मा गांधीच्या रामराज्याच्या कल्पनेत स्वाय्यत व स्वयंपूर्ण खेड्यांना विशेष महत्व होते. आपल्या देशात खेड्यांना प्राप्त झालेले मध्यवर्ती स्थान विचारात घेऊन ग्राम स्वराज्याचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या संकल्पनेला मूर्त रुप देण्यासाठीघटनेतील कलम ४० नुसार ग्रामपंचायत स्थापन करण्याचे अधिकार राज्य सरकारला देण्यात आले. राज्य घटनेतील भाग ४ मध्ये राज्यधोरणाच्या निती निर्देशक तत्वांमध्ये अनुच्छेद ४० नुसार राज्य हे ग्रामपंचायती संघटीत करण्याकरीता उपायोजना करीत व त्यांना सक्षम करण्यास प्रयत्न करले . तसेच या पंच्यात व्यवस्थेमध्ये वेळोवेळी बदल करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना केली व या समित्यांच्या शिफारशीनुसार पंच्या राज व्यवस्थेचे संघटनात्मक रचना व इतर सुधारणा करण्यात आल्या आणि पंचायत व्यवस्थेला बळकटी प्राप्त करून दिली

## अ.) सामुदायिक विकास कार्यक्रम

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताला ज्या अनेक समस्यांचा सामना करावा लागला त्यातील एक समस्या आर्थिक मागासलेपणा ही होती. ती दुर करण्यासाठी १९५१ साली पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली. पाच वर्षाच्या कालावधीत राज्याची आर्थिक उद्दीष्ठ साध्य करणे व त्यासाठी कालावधीत प्रयत्न करणे अशा पंचवार्षिक योजनेची अम्मलबजावणी सरकारने केली. या योजनेत सरकारने शेती विकासावर जास्त भर दिला. या योजनेमध्ये ग्रामीण पुनर्रचनेलाही महत्वाचे स्थान दिले. त्याचा एक भाग

म्हणून सरकारने पंचायतराज व्यवस्था राबवली सामुहिक विकास कार्यक्रमातून पंचायतराज्याच्या स्थापनेने खऱ्या अर्थाने चालना मिळाली.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागाचे मागासलेपण दूर करण्यासाठी आणि त्या समाजाधील निरनिराळ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि उपाययोजना करणे सरकारला भागच होते.कारण वसाहतीच्या काळातील ब्रिटीश शासन जाऊन आपले सरकार आले होते. तेव्हा आपल्या सरकारकडून जनतेच्या अपेक्षा असणे स्वाभाविक होते. याचे भान ठेवून सरकारने आर्थिक विकासाला प्राधान्य दिले. त्यासाठी नियोजकाचा अवलंब करून पंचवार्षिक योजनेची सुरूवात केली योजनेचे यश ग्रामीण समाजाच्या विकासावर अवलंबून आहे कारण १९५१ च्या एकूण लोकसंख्येपैकी ८२.७ % लोक ग्रामीण समाजात म्हणजे खेड्यात राहणारी होते. जोपर्यंत ग्रामीण समाजाचे मागासलेपण दुर होत नाही किंवा त्यांच्या विकासासाठी चालना मिळत नाही तोपर्यंत या देशाच्या आर्थिक विकासाचे स्वप्न साकार होणार नाही हे उघड होते. म्हणून भारत सरकारने ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पंचवार्षिक योजनेला गती प्राप्त करून देण्यासाठी समाज विकास योजना किंवा सामुहिक विकास कार्यक्रम २ ऑक्टोंबर १९५२ सुरु केला. २ ऑक्टोंबर १९५२ हा दिवसा महात्मा गांधींच्या जयंतीपासून देशात समाज विकास कार्यक्रमाला प्रारंभ झाला. याची उद्दिष्टे खलीलप्रमाणे

**योजनेची उद्दिष्टे -**

१. विकासाच्या कार्यात ग्रामीण जनतेला सहभागी करून घेणे.

२. ग्रामीण भागातील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मानवी शक्तीण यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेउन ग्रामीण समाजाला आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे

३. विकास कामाच्या माध्यमातून ग्रामीण जनतेच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे

४. ग्रामीण जनतेच्या भौतिक आणि सांस्कृतिक जिवनात तसेच तिच्या मानसिकतेत परिवर्तन घडवून आणणे.

५. ग्रामीण जनतेमधून स्थानिक पातळीवरील विधायक वृत्तीच्या कार्यक्षम नेतृत्वाचा विकास साधणे.

६. ग्रामीण लोकांमध्ये प्रागतिक दृष्टीकोन विकसित करून त्या योगे त्यांना राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे.

याचबरोबर शेतीचा विकास, शिक्षण प्रसार, दळणवळणाच्या साधनाचा विकास, रोजगार निर्मिती, आरोग्य सुविधा, व्यवसाय प्रशिक्षण, गृहनिर्माण, समाजकल्याण इ. गोष्टीचा आंतरभाव करण्यात आला होता. या योजनेच्या कार्यवाहीसाठी केंद्र स्तर, राज्यस्तर, जिल्हास्तर, विकासगट स्तर व ग्रामस्तर अशा एकूण पाच स्तरावर विभाजन करण्यात आले होते.याप्रकारे सामुदायिक विकासाच्या माध्यमातून पंचायत राज व्यवस्थाच्या बळकट करण्याचा प्रयत्न झाला.

**ब.बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसी :-**

सामुदायिक विकास योजना आणि राष्ट्रीय विस्तार सेवा यांना आलेले अपयश लक्षात घेऊन केंद्र सरकारने श्री बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १६ जानेवारी १९५७ रोजी एका समितीची नियुक्ती केली. या समितीमध्ये ठाकूर फुलसिंग, डी.पी. सिंग व बी.जी. राव हे या समितीचे इतर सदस्य होते. मेहता समितीने आपला अहवाल २४ नोव्हेंबर १९५७ रोजी सादर केला. मेहता समितीच्या शिफरशी या प्रामुख्याने दोन घटकांवर आधारलेल्या आहेत या दोन्ही बाबींचा अधिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने मेहता समितीने आपल्या शिफारशीत भर दिल्याचे दिसून येते.

१. राजकीय सत्तेचे फार मोठ्याप्रमाणात विकेंद्रीकरण करून सामान्यातल्या सामान्य माणसाला राजकीय सत्तेत सहभागी करून घेणे.

२. सामान्य माणसाच्या मदतीने व सहकार्याने ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास करणे.

३. पंचायतराज व्यवस्थेतील सर्वात खालचा स्तर म्हणजे ग्रामपंचायत ही खऱ्या अर्थानेप्रातिनिधीक स्वरुपाची असावी. तिचे सर्व सदस्य प्रौढ मतदारातून मतदानाच्या पध्दतीनुसार प्रत्यक्ष निवडणूकिद्वारे निवडण्यात आलेले असावेत.\

४. राज्य सरकारच्या खालच्या पातळीवरील सत्ता व जबाबदाऱ्याचे संपूर्ण विकेंद्रीकरण करण्यात यावे.

५. पंचायतराज व्यवस्थापनात त्यांच्या भविष्यकालीन विकासात बळकटी यावी यासाठी राज्य सरकारंनी जास्तीत जास्त अधिकार द्यावेत. जबाबदारी सोपबाबी व उत्पन्नाचे अधिकाअधिक साधने त्यांच्याकडे सोपवावीत ज्यामूळे पंचायतराज व्यवस्थेला गतीमानता येईल केवळ राज्यसरकारने मार्गदर्शन, देखरेख व उच्च पातळीवरचे नियोजन करावे ब आवश्यक त्या ठिकाणी जास्त पैसे उपलब्ध करून देण्याचे अधिकार ठेवावेत.

६. ग्रामपंचायत ही पूर्णत: पंचायत समितीच्या नियंत्रणाखाली आपले कार्य करते

७. पंचायत समितीकडे महत्त्वाची कार्य सोपवली जातील. उत्पन्नाचे साधने पंचायत समितीकडे राहतील मध्यस्थ संस्था म्हणून ग्रामीण विकासामध्ये पंचायत समितीची भूमिका महत्त्वपूर्ण असेल.

८. सामाजिक आर्थिक स्थितीची विविधता लक्षात घेता काही राज्यात या प्रास्ताविक व्यवस्थेत (रचनेत) सुधारणा बदल करता येईल ते जिल्हा पातळीवरील संस्थेला अर्थात जिल्हा परिषदेला अधिक अधिकार देतील.

९. पंचायतराज व्यवस्थेतील त्रिस्तरीय पध्दतीत कार्य करणाऱ्या लोकप्रतिनिधीला उपयुक्त प्रशिक्षण देण्यात यावे.

१०. पंचायतराज व्यवस्थेत जिल्हा परिषद ही सल्ला देणारी संस्था असावी तिला तिनही स्तरातील सर्व कामात एकसुत्रता आणण्याची जबाबदारी सोपवावी.

११. निर्वाचित लोकप्रतिनिधकडून सामुहिक विकास कार्यक्रम ब इतर कार्यक्रमाचे नियोजन अंमलबजावणी करण्यासाठी नोकरशाही कडून त्यांची प्रत्यक्ष कार्यवाहीव्हावी. याचे अधिकारी कर्मचारी यांना पूरेशे ज्ञान व सकारात्मक दृष्टीकोन ठेवता यावा. यासाठी कार्यशाळा, परिषदा,

चर्चासत्र व प्रशिक्षणाचे उपक्रम राबवावेत. आर्थिक विकासाच्या बाबीवर विशेष भर देण्यात यावा. ज्यात पिण्याचे पाणी, शेती, सहकारी, चळवळ, ग्रामीण उद्योग, पशुधन सुधारणा, आरोग्य यावर भर द्यावा.

१२. सरकारकडून आलेल्या पैशाची विकास गटात विभागणी करणे, आपल्या विभागातील पंचायत समित्यांचे वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणे, विकासगटातील योजनामध्ये एकसुत्रता आणने आणि पंचायत समित्यांना त्याच्या कामात मार्गदर्शन करणे इत्यादी कामे जिल्हा परिषदेवर सोपविण्यात यावीत.

थोडक्यात, पंचायतीराज संस्था या केवळ लाभार्थी म्हणून नसाव्यात तर त्यांनी विकासात्मक महत्वाची भूमिका पार पाडावी आशी अपेक्षा या समितीची होती. या समितीचे ग्रामीण भागातील महिलांच्या परिस्थितीचा अभ्यास करून त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्याचे व बालकांचा विकास करण्याचे मार्ग सुचवावेत अशी अपेक्षा करण्यात आली होती. बलवंतराय मेहता समितीने आपल्या अहवालात काही उपाय देखील सुचविले होते. त्यामध्ये धुरविरहीत चुली, स्वच्छ परिसर, पाणी पुरवठा, गुरांची निगा, शिवणकाम यासारख्या उपायांचा समावेश होता. तसेच पंचायती राजसंस्थांत महिला विस्तार अधिकारी व ग्रामसेविका यांच्या नियुक्त्या करून त्यांच्यावर महिला विकासाची जबाबदारी सोपवावी असेही या समितीने सुचविले होते, परंतु हे सर्व कार्य घरगुती स्वरूपाचे असल्यामुळे महिलांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणार नाही अशी या समितीची धारणा होती. तरी सुध्दा पंचायतीराज संस्थात महिलांना प्रतिनिधीत्व देण्याच्या बाबतीत या समितीचा आग्रह होता हे सुध्दा विसरता येणार नाही. राष्ट्रीय विकास परिषदेच्या बैठकीत १२ जानेवारी १९५८ रोजी बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी मान्य करण्यात आल्या. परंतु राष्ट्रीय विकास मंडळाने अगदी काटेकोर स्वरूपाच्या कोणत्याही विशिष्ट व्यवस्थेचा आग्रह धरला नाही. त्याने राज्यांना त्यांच्या स्थानिक परिस्थितीला अनुरूप ठरेल अशी स्वतःची वेगळी व्यवस्था तयार करण्याचे स्वातंत्र्य दिले.

२ ऑक्टोबर १९५९ मध्ये प्रथम राजस्थान सरकारने पंचायत राज्याची अंमलबजावणी सुरू केली. तत्कालीन परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होती. १ मे १९६० ला स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्र सरकारने बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार राज्यात पंचायतराजव्यवस्था सुरू करण्यासाठी तत्कालीन महसुलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली.

**क. १. वसंतराव नाईक समिती :**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर तत्कालीन महसूली मंत्री वसंतराव नाईक याच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरणाचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली. या समितीत ग्रामविकास मंत्री भगवंतराव गाढे शिक्षण मंत्री बाळासाहेब देसाई, रांज्याचे अर्थसचिव एम. आर. यार्दी, सहकार व ग्रामविकास खात्याचे सचिव डी.डी. साठे आणि पुणे विभागाचे कमिशनर एस.पी. मोहिते यांची तर सचिव म्हणून पी. जी. साळवी यांची नियुक्ती करण्यात आली होती.

वसंतराव नाईक समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ रोजी सरकारला सादर केला. या अहवालात एकूण २२६ शिफारशी करण्यात आल्या होत्या. महाराष्ट्र शासनाचे बहुतांशी स्विकारल्या व महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ संमत करून त्रिस्तरीय पंचायत राज्याची स्थापना केली. नाईक समितीने आपल्या अहवालात काही महत्त्वाच्या शिफारसी खालीलप्रमाणे आहे.

अ) जिल्हापरिषदेसंबंधी समितीच्या शिफारशी-

१. जिल्हापातळीवर एक समर्थ असे जिल्हा परिषद या नावाचे कार्यकारी मंडळ स्थापन करण्यात यावे.

२. जिल्हा परिषदेच्या प्रत्यक्षपणे निवडून येणाऱ्या सभासदांची संख्या ४० पेक्षा कमी आणि ६० पेक्षा जास्त असू नये.

३. २५ हजारते ३५ हजार लोकसंख्या असलेल्या एकसदस्यीय प्रादेशिक मतदारसंघातूनएक सभासद निवडण्यात यावा.

४. वर्गीकृत जाती, वर्गीकृत जमाती व महिला यामधून प्रत्यक्ष निवडणूकीतून एकही सदस्य निवडून न आल्यास प्रत्येक प्रवर्गातून एकेक सदस्य स्विकृत करावा. तसेच एक अध्यक्ष असावा, स्थायी समिती असावी, विषय समित्या असाव्यात, खासदार, अमदारांना सदस्यत्व असू नये, जिल्ह्याअधिकाऱ्याचा हस्तक्षेप असू नये.

५. जिल्हा मंडळाचा एक अध्यक्ष उपाध्यक्ष व स्थायी समिती ब सहा विषय समित्या असाव्यात.

६.जिल्हा मंडळ हे केवळ शासकोय अनुदानावरच अवलंबून असू नये त्यांच्या कार्यक्रमासाठी ब नियोजनातील योजना करीता लागणाऱ्या एकूण निधीपैकी काही भाग त्यांनी स्वतः उभा करावा.

७.जिल्हा मंडळाला महसुलापैकी७०% रक्कम मिळावी.

८.जिल्हा मंडळाने जमीन महसूल व लोकल फंड सेस (गंगाजळी) वाढविण्याचे ठरविले असेल तर त्या ठरावाला आवश्यक मताधिकाने संमती दिल्यास सरकारने त्यानुसार शेतसाऱ्याचे दर ठरवण्याचे काम हाती घ्यावे व सेस वाढवून द्यावा.

१०.जिल्हा मंडळाचे काम हे प्रमूख सात विभागात विभागण्यात यावे १) सर्वसाधारण, २) अर्थ, ३) बांधकाम, ४) सहकार ब उद्योग, ५) शेती, ६) आरोग्य, ७) शिक्षण.

ब) पंचायत समितीच्या संदर्भातील शिफारशी

वर्गीकृत जाती, वर्गीकृत जमाती व महिला यांच्या प्रत्येक एक प्रतिनिधी या समितीवर निवडून आला नसेत तर पंचायत समितीने या वर्गाचा प्रत्येकी एक सभासद नियुक्तीकरावा याचबरोबर विकास गटातील सभासदत्व, दान सरपंच, पदसिध्द सभासद असावेत इत्यादी शिफारशी केलेल्या आहेत.

क) ग्रामपंचायतीच्या संदर्भातील शिफारशी

प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक ग्रामसेवकाची नियुक्ती, ग्रामसेवकावर ग्रामपंचायतीचे नियंत्रण, एक हजार किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावासाठी एक वेगळी ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावी. जिथे लोकसंख्या कमी असेल तिथे गटग्रामपंचायत असावी अशी शिफारशी केली.

नाईक समितीने स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरेशेव व्यापक अधिकार देण्याचे सुचविले आहे. जिल्हा तालुका व ग्राम पातळी योजनापैकी ज्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थाकडून अधिक परिणामकारक पार पाडल्या जातात. त्यांच्या बदलीत स्थानिक उपक्रमशिलता व सहकार्य यांच्यामुळे विकासाला चालना मिळणार असेल तर अशा सर्व योजना स्थानिक क्षेत्राकडे बळती करण्यात याव्यात. नाईक समितीने जिल्हा परिषद वित्त विषयाच्या शिफारसी करताना सुचविले को, कराची व बिगर कराची साधने जिल्हा परिषदेला मिळवून द्यावेत. लोकल फंड सेस हा जमीन महसूलाच्या एक रुपयाला २० पैसे याप्रमाणे सामान पातळीवर असावा. तसेच समानीकरण पध्दतीने अनुदान देण्याची पध्दत वापरावी त्याच अटी व शतीवर ७५% प्रयोजन अनुदान द्यावे. त्याबरोबर वर्ग ९ व वर्ग २ ह्या अधिकाऱ्यांना वेतनावरील सर्व खर्च राज्य शासनाने करावा. केवळ प्रवासभत्ता व दैनिक भत्ता जिल्हा परिषदेने करावा त्याचप्रमाणे ३ ब ४ श्रेणी कर्मचाऱ्यांबरील होणारा ७५% खर्च राज्य सरकारने करावा या समितीच्या शिफारशी महाराष्ट्रात १९६१ अधिनियमात संमत करण्यात आल्या आहेत. '

**२. बोंगिरवार समिती**

महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाची अंमलबजावणीतसेच जिल्हा परिषदेचे कार्य ब मुल्यमापन करण्यासाठी २६ फेब्रुवारी १९७० रोजी श्री. ल.ना. बोंगिरवार यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली. या समितीने महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थाचा अभ्यास करून २०२ शिफारसीसह आपला अहवाल १५ सप्टेंबर १९७१ रोजी सरकारला सादर केला

पंचायतराज संस्थेने आपले कार्य प्रभावीपणे पारपाडण्यासाठी या संस्थांना स्वायतता देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अशा संस्थांनी प्रभावी कार्यक्षम काम करावे यासाठी सरकारने स्वतःचे नियंत्रण ठेवून सहकार्य केले पाहिजे. पंचायत राजकडून अपेक्षा पेक्षा काही कार्यात यश मिळाले नाही त्याचे कारण म्हणजे या संस्थाच्या वित्तिय संस्था हे कारण आहे म्हणून या कार्यपध्दतीत बदल केला पाहीजे. यासाठी राज्य सरकारने राज्य. जिल्हा परिषद, पंचायत समित्या या तिन्ही क्षेत्रातील कामाची सुस्पष्ट यादी करुन यादीतील पुरक अशी वित्तीय व्यवस्था तयार करावी. तसेच गावपातळीवरील करावयाच्या कामासाठी लोकवर्गणी टक्केवारीत न ठरवता ती एकरक्कमी लोकवर्गणीची तरतूद करावी.

ल. ना. बोंगिरवार समितीने केलेल्या जिल्हा परिषदेविषयी शिफारसी

१) स्थायी ब विषय समितीच्या सदस्या संख्येत बाढ करुन या समितीत काम करणाऱ्या तज्ज्ञाना घेताना त्याची शैक्षणिक पात्रता या निकषानुसार करण्यात यावी.

२) उपकरातील वाढ ही किमान ५ वर्ष ब कमाल १० वर्ष अंमलात राहील याची काळजी घेवून बाढीब उपकर रद्द करण्याचा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्रस्तावाला राज्यशासनाने परवानगी देवू नये.

३) शेतीवरील उत्पन्न कर जिल्ह्याच्या बसूलीच्या प्रमाणात जिल्हा परिषद देण्यात यावा.

४) ज्या प्रामणात जिल्हा परिषद आपल्या कार्यक्षेत्रात करात बाढ करते त्याच्या प्रमाणात प्रोत्साहनपर अनुदान देण्यातयावे.

५) बांधील योजनांसाठी जिल्हा परिषद शासनाकडून पूर्ण आथिक सहकार्य मिळावे

६) अभिकरण तत्वाबर दिलेल्या योजनांच्या बाबतीत योजना निहाय पूर्ण निधी जिल्हा परिषदेला देण्यात यावा.

७) जिल्हा परिषदांना मिळणाऱ्या महसूली ब समकरण अनुदानातून ५०% रक्कम अनु.जाती/जमाती भूमिहीन शेतमजूर सिमांत शेतकरी व दूबल घटकांवर ती रक्कम खर्च केली पाहिजे.

८) प्रत्येक जिल्ह्यात कृषी उद्योग महामंडळाची स्थापना करुन त्यात राज्यशासन, राज्य कृषी उद्योग महामंडळ व जिल्हा परिषद सहभागी करुन भागभांडबलदार बनवावे.

९) ग्राम विकास विभागाने विकास सेवा संवर्ग स्थापन करावा ज्यात जिल्हा परिषद मधील नियोजन अधिकारी, प्रशासकीय अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी या जागी वर्ग -१ अधिकाऱ्यांचा समावेश करावा.

१०) अथिक वर्ष यांचा विचार न करता जिल्हा परिषदेला दिलेली अनुदाने ही जिल्हापरिषदेने सलग १२ महिन्याचा कालावधी धरुन खर्च करावा.

११) कलम १५७ मध्ये दुरूस्ती करुन कराधान विषयक अधिकार केवळ राज्यशासनाकडे ठेवावेत तसेच जिल्हा परिषदेला आवश्यक असणाऱ्या उत्पादक कार्यासाठी १००% अनुदान द्यावे.

१२) लघु पाटबंधारे योजनेमध्ये लोकाच्या लोकवर्गणीचा प्रत्यक्ष सहभाग असावा.

१३) ग्रामीण रस्ते दुरुस्ती ब देखभाल करण्यासाठी शासनाने विशेष सहकार्य करावे

१४) ग्रामीण भागातील पाणीपूरवठा यासाठी शासनाने भरीव अधिक निधी घ्यावा.

१५) जमीन महसूल कराची जास्तीत जास्त मर्यादा ज्या जिल्ह्यात जमीन महसूल दरडोई २ रु. पेक्षा कमी असेल तेथे १.५० पेक्षा २.५० किंवा ३.५० पैसे असा ठेवावा.

१६) बवनमहसूल अनुदानामध्ये २% वरुन ५% पर्यंत बाढ कराबी.

१७) एजन्सी योजनासाठी वरकड खर्च म्हणून ३% खर्च द्यावा.

१८) प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या वाढवून प्राथमिक आरोग्य केंद्रातील औषध उपचार निधीची तरतूद करावी.

अशा प्रकारे या समितीने पंचायतराज्यांचे मुल्यमापन करून पंचायतराज व्यवस्थेतील मुख्य दोष व्यवस्थेच्या अंमलबजावणीतच असल्याचे स्पष्ट केले. पंचायत राजव्यवस्था ग्रामीण जनतेच्या अपेक्षांची

पूर्तता करण्यात कमी पडली आहे. त्याचे कारण सांगताना त्यांनी मुख्यदोष व्यवस्थेच्या अंमलबजावणीतीलच आहे हे स्पष्ट केले आहे.

**३. प्राचार्य पी.बी. पाटील समिती**

महाराष्ट्रातील पंचायत राज्यव्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेली एक महत्वांची समिती म्हणून प्राचार्य पीबी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायतराज्य मूल्यमापन समितीची स्थापना केली. या समितीपुढे पंचायत राज्य पुनर्विलोकन करण्याचे आव्हान उभे होते. तसेच पंचायतराज्य व्यवस्थेचे उद्दिष्टे कितपत साध्य झाली आहेत? पंचायत राज्यव्यवस्थेचा संस्थात्मक, आर्थिक व प्रशासकीय रचनेत फेरबदल करावा काय ? अशा अनेक प्रश्नांच्या कार्यकक्षा या समितीच्या पुढे होत्या. प्राचार्य पी.बी. पाटील समितीने वरील सर्व प्रश्नांचा अतिशय काळजीपूर्वक व सखोल अभ्यास केला आणि त्याआधारे जून १९८६ मध्ये आपला अहवाल सादर केला. यातील प्रमूख शिफारसी खालील प्रमाणे आहेत.

१) जिल्हा परिषदेच्या निवडणूका वेळेवर घेतल्या जाव्यात

२) महाराष्ट्रातील ग्रामपंचायत अधिनियम आणि जिल्हा परिषद ब पंचायत समिती अधिनियम यांचे एकत्रिकरण करुन महाराष्ट्र पंचायतराज अधिनियम असा एकच अधिनियम करावा.

३) जिल्हा नियोजन मंडळावर आमदार व  खासदार हे सदस्य असावेत.

४) जिल्हा परिषद निर्वाचित जागापैकी २५ % जागा महिलांसाठी राखीव असाव्यात.

५) जिल्हा परिषद अनुसुचित जाती-जमाती राखीव जागा लोकसंख्येच्या प्रमाणात
असाव्यात ब राखोब मतदार संघ फिरते असावेत

६) जिल्हा परिषदेमध्ये आमदार व खासदार प्रतिनिधीत्व देण्यात येवू नये

७) जिल्ह्यातील महानगर पालिका वगळता उरलेल्या 'अ', “ब', “क” वर्ग नगर पालिकांचे अध्यक्ष हे जिल्हा परिषद पदसिध्द सहयोगी सभासद असावेत.

८) सप्रयोजन अनुदानात वाढ करावी.

९) जमीन महसूल व त्यावरील उपकर यांच्यापासून पंचायतराज संस्थांना द्यावयाचेउत्पन्न वसूली आधारभूत न घेता "'मागणी' आधारीत असावेत.

१०) जिल्हा परिषदांना उत्पन्न वाढवण्यासाठी भारत सरकार ब राज्य सरकार सध्या जे कर आकारणी करतात ते कर बगळता अन्य कर आकारणी अधिकार जिल्हा परिषदेला देण्यात यावेत.

११) वन महसूल अनुदान५% वरुन १०% करण्यात यावा.

१२) सत्तेच्या केंद्रीकरणाची प्रक्रिया थांबवून पुन्हा विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेस सुरूवात.

१३) तलाठी, मामलेदार व बी.डी.ओ. आदी महसुल खाते व जिल्हा परिषद पंचायतसमितीचे सेवक वर्ग जनतेला एकत्रित व निश्चित वेळेवर भेटन्यासाठी ग्रामविकास कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१४) जिल्हा परिषदेची मुदत पाच वर्षांची असावी.

१५)महिला विकास व बालविकास समित्यांची स्थापना व अध्यक्षपद महिलांसाठी राखीव असावे.

१६) अविश्वासा ठराव वारंवार आणुन अस्थिरता येउ नये म्हणूनकिमान १/३ सदस्यांच्या सदस्यांची आवश्यकता असावी असा ठराव वर्षातून एकदाच करण्यात येईल.

**समारोप:**

पंचायंत राज्य हे ग्रामीण पुनर्रचनेचे आणि ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण परिवर्तनाचे एक महत्वाचे साधन बनले आहे, ही गोष्ट मान्य करावी लागले. पंचायत राज्यव्यवस्थेत काही उणिवा जरूर आहेत. पंचायत राज्यामुळे ग्रामीण समाजजीवनात काही समस्या नव्याने निर्माण झाल्या आहेत हे देखील खरे आहे, पण पंचायत राज्याच्या सगळ्या उणिवा मान्य करूनही असे म्हणता येईल की, ग्रामीण महाराष्ट्राच्या निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या कामी पंचायत राज्यासंस्थानी

महत्वाचा वाटा उचलला आहे. शेतीसुधारणा, शिक्षणप्रसार, सहकार, समाजकल्याण, ग्रामसुधारणा इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये या संस्थांनी महत्वपूर्ण योगदान केले आहे त्यापेक्षाही महत्वाची गोष्ट म्हणजे पंचायत राज्याने ग्रामीण जनतेच्या मानसिकतेत मोठा बदल घडवून आणला आहे ग्रामीण जनतेला विकास कार्यातील आपला वाटा उचलण्यास तिला तयार करण्याचे फार मोठे कार्य पंचायत राज्यसंस्थानी केले आहे. म्हणून ग्रामीण पुनर्रचनेच्या प्रमुख साधनांमध्ये ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाचे एक महत्वाचे साधन म्हणून पंचायतराज व्यवस्थेकडे पाहिले जाते ग्रामीण जनतेच्या विकासात या संस्थांचा महत्वाचा वाटा आहे.

स्वाध्याय

प्रश्न १. अ.एका वाक्यात उत्तरे लिहा

१.राज्यघटनेच्या कोणत्या कलमात पंचायात राज व्यवस्थाची तरतूद केली आहे ?

२.सामुदायिक विकास कार्यक्रम कधी सुरुझाला ?

३.वसंतराव नाईक समिती कोणत्या राज्याने स्थापन केली ?

४.पंच्यात राज स्थापन करणारे पहिले राज्य कोणते?

५.प्रा.पी.बी.पाटील समिती कधी स्थापन झाली ?

ब. रिकाम्या जागा भरा

१. बलवत राया मेहता समिती ...............................साली स्थापन झाली

२.वसंतराव समितीने ...........................पंचायत राजा व्यवस्थेची शिफारस केली.

३.महात्मा गांधी यांचे ..............................स्वप्न होते.

४. प्राचार्य पी.बी. पाटील समितीने ........................साली अहवाला महाराष्ट्र शासनाला दिला.

५.जिल्हा परिषदेचा कार्यकाल ५ वर्षाचा साव अशी शिफारस.............................समितीने केली.

प्रश्न २. अ. टिपा लिहा

१.सामुदायिक विकास कार्यक्रम

२. बोंगिरवार समिती

३. प्राचार्य पी.बी. पाटील समितीने

ब. उत्तरे लिहा

१. बलवंतराय समितीची पंचायत राज व्यवस्थेतील भूमिका स्पष्ट करा?

२.महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्थमध्ये वसंत राव नाईक समितीच्या शिफारशीवर चर्चा करा ?